# फळझाडांना द्या संतुलित खते

डॉ. आदिनाथ ताकटे
मृद शास्त्रज्ञ
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

फळझाडांच्या लागवडीचे यशापयश हे जमीन, हवामान, खत व्यवस्थापन आणि पाणी पुरवठा यावर विशेष अवलंबून आहे. यापैकी खत व्यवस्थापनास अनन्य साधारण महत्व आहे. फळझाडांची लागवड केल्यानंतर नियमित आणि भरपूर उत्तम दर्जाची फळे येण्यासाठी जमीन सुपीक ठेवणे जरुरीचे आहे.

फळझाडांची वाढ आणि त्यावर होणारी फलधारणा जमिनीतून मिळणाऱ्या पोषक अन्नद्रव्यावर आणि स्थानिक हवामानावर अवलंबून असते. त्यामुळे या दोन महत्वाच्या बाबीपैकी जमिनीच्या सुपिकतेकडे लक्ष देणे अत्यंत महत्वाचे आहे. जमिनीच्या सुपिकतेकडे दुर्लक्ष झाल्यास झाडांची वाढ कमी होते आणि झाडे किडी व रोगास बळी पडतात. झाडांची वाढ निकोप व्हावी म्हणून योग्य मशागत, तणांचा बंदोबस्त, खतांचा संतुलित पुरवठा, सेंद्रीय पदार्थांचे आच्छादन म्हणून वापर, आच्छादनाची पिके, आंतरपिके इत्यादी मार्गांनी जमिनीची सुपिकता चागली ठेवणे फायदेशीर ठरते.

फळझाडांच्या लागवडीसाठी योग्य आकाराचा खड्डा, (तक्त्यात दिल्याप्रमाणे) योग्य अंतरावर एप्रिल–मे महिन्यातच खोदावेत. उन्हाळ्यात खड्डे तापू द्यावेत. खड्डा भरताना तळाला पालापाचोळा टाकून १५ ते २० किलो चांगले कुजलेले शेणखत व पोयटा माती व १ ते १.५ किलो सिंगल सुपर फॉसपेट व ५०–१०० ग्रॅम फॉलीडॉल पावडर यांच्या मिश्रणाने जूनच्या पहिल्या आठवड्यात भरून घ्यावा. दोन चांगले पाऊस पडून गेल्यावर सर्वसाधारणपणे जून– जुलै महिन्यात रोपांची/कलमांची लागवड करावी. रोप/कलमे खात्रीशीर रोपवाटिकेतूनच खरेदी करावीत.

सर्वसाधारणपणे फळझाडांना जून–जुलै, सप्टेंबर –ऑक्टोबर व जानेवारी–फेब्रुवारी या महिन्यात खते द्यावीत. परंतू खते देताना प्रत्येक फळझाडाचा बहार येण्याचा व फळे पक्व होण्याचा कालावधी लक्षात घेऊन खते द्यावीत. सर्वसाधारणपणे जून–जुलै महिन्यात संपूर्ण शेणखत अथवा कंपोस्ट खत, संपूर्ण स्फुरद व पालाश ची मात्रा द्यावी. नत्राची मात्रा एक ते दोन हप्त्यात विभागून द्यावी. खते देण्यापूर्वी तज्ञांचा सल्ला घ्यावा.

खताची मात्रा देताना मोठ्या विस्ताराखाली खोडापासून एक मीटर लांब ४० ते ५० से.मी. रुंद आणि १५ से. मी. खोल वर्तुळाकार चर काढावा. प्रथम चरात पालापाचोळा आणि शेणखत नंतर रासायनिक खते सर्व बाजूनी टाकावी नंतर चर मातीने बुजवावा.

## • विविध फळझाडांना वयोमानानुसार द्यावयाची खत मात्रा:

| फळझाड | फळझाडाचे वय वर्ष | शेणखत/ कंपोस्ट खत किलो/झाड | रासायनिक खतांची मात्रा (ग्रॅम प्रती झाड) | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | नत्र (युरिया) | स्फुरद (एसएसपी) | पालाश (एमओपी ) |
| आंबा | १० | ५० | १५०० (३२५५) | ५०० (३१२५) | ५०० (८३५) |
| चिकू | १० | १०० | ३००० (६५१०) | २००० (१२५००) | २००० (३३४०) |
| पेरू | ५ | ५० | ९०० (१९५३) | ३०० (१८७५) | ३०० (५०१) |
| अंजीर | ५ | ५० | ९०० (१९५३) | २५० (१५६२) | २७५ (४६०) |
| लिंबू | ४ | १५ | ६०० (१३०२) | ३०० (१८७५) | ६०० (१००२) |
| मोसंबी | ५ | १५ | ३०० (६५१) | १०० (६२५) | १०० (१६७) |
| डाळिंब | ३ | ५० | ६२५ (१३७५) | २५० (१५५०) | २५० (४४०) |
| नारळ | ५ | ५० | १००० (२१७०) | ५०० (३१२५) | १००० (१६७०) |

### आंबा:

पूर्ण वाढलेल्या झाडास (१० वर्ष व अधिक) जून–जुलै महिन्यात ५० किलो शेणखत, (१५००:५००:५०० ग्रॅम/झाड नत्र:स्फुरद:पालाश) दीड किलो युरिया, तीन किलो एसएसपी व एक किलो एमओपी द्यावे. सप्टेंबर व फेब्रुवारी महिन्यात पाऊण किलो युरिया प्रत्येकी द्यावा.

### चिकू:

पूर्ण वाढलेल्या प्रत्येक झाडास १०० किलो शेणखत, (३:२:२ किलो/झाड नत्र:स्फुरद:पालाश) तीन किलो नत्र (६.५ किलो युरिया), दोन किलो स्फुरद (१२.५ किलो एसएसपी) व दोन किलो पालाश (३.५ किलो एमओपी) जुन– जुलै महिन्यात द्यावे. उर्वरित निम्मा नत्राचा हफ्ता सप्टेंबर मध्ये द्यावा.

नारळ:

५ ते ६ वर्षाच्या नारळाच्या झाडास ५० किलो शेणखत, (१०००:५००:१००० ग्रॅम/झाड नत्र:स्फुरद:पालाश) म्हणजेच दोन किलो युरिया, तीन किलो सिंगल सुपर फॉसपेट आणि साडेतीन किलो म्यूरेट ऑफ पोटॅश तीन समान हफ्त्यात द्यावे. (जून–सप्टेंबर व फेब्रुवारी) पैकी संपूर्ण शेणखत व सिंगल सुपर फॉसपेट जून महिन्यातच एकाच वेळी द्यावीत. रोपे लावल्यानंतर पहिल्या वर्षी रोपांची मुळे ३० से. मी. अंतरापर्यंत सभोवती विखरून टाकावीत आणि खुरप्याच्या सहाय्याने मातीत मिसळावी. त्यानंतर पुढील प्रत्येक वर्षी खते देताना ३० से.मी. अंतर वाढवत जावे व पाचव्या वर्षी व त्या पुढे १.५ ते १.८० मीटरपर्यंतच्या अंतराने ती पसरून टाकावीत आणि ती मातीत मिसळावी.

पेरू:

पूर्ण वाढलेल्या पेरूच्या झाडास ५० किलो शेणखत, (९००:३००:३०० ग्रॅम/झाड नत्र:स्फुरद:पालाश) म्हणजेच दोन किलो युरिया, दोन किलो एसएसपी व अर्धा किलो एमओपी द्यावे. यापैकी निम्मे नत्र (एक किलो युरिया) बहारच्या वेळी व उरलेला नत्र फलधारणेनंतर द्यावा. तर स्फुरद व पालाश एकाच हफ्त्यात बहारच्या वेळी द्यावे.

अंजीर:

पूर्ण वाढलेल्या अंजिराच्या झाडास, अंजिराची झाडे सुप्तावस्थेत असताना बागेत खोल खादंणी करावी. प्रत्येक झाडास ५० किलो शेणखत, (९००:२५०:२७५ ग्रॅम/झाड नत्र:स्फुरद:पालाश) दोन किलो युरिया, दीड किलो एसएसपी व एक किलो एमओपी छाटणी नंतर द्यावे. फळधारणेनुसार नत्र (युरिया) दोन वेळा विभागून एक महिन्याच्या अंतराने द्यावे.

लिंबू:

पूर्ण वाढलेल्या चार वर्षाच्या लिंबूच्या झाडास जून–जुलै महिन्यात १५ किलो शेणखत, १५ किलो निबोळीपेंड (६००:३००:६०० ग्रॅम/झाड नत्र:स्फुरद:पालाश) सुफला (१५:१५:१५) एक किलो, अर्धा किलो एमओपी द्यावे. सप्टेंबर महिन्यात ३०० ग्रॅम युरिया व जानेवारी महिन्यात ३०० ग्रॅम युरिया द्यावा. वरील खतांशिवाय ५०० ग्रॅम व्हॅम + १०० ग्रॅम पीएसबी + १०० ग्रॅम ट्रायकोडर्मा हरजियानम + १०० ग्रॅम ॲझोस्पिरिलम द्यावे. सूक्ष्म अन्नद्रव्याची कमतरता आढळल्यास ०.५ % झिंक सल्फेट, ०.५ % मॅग्नेशियम सल्फेट, ०.३ % फेरस सल्फेट व कॉपर सल्फेट या सूक्ष्म अन्नद्रव्याची एकत्रित फवारणी करावी.

मोसंबी:

पूर्ण वाढलेल्या पाच वर्षाच्या प्रत्येक झाडास २० किलो शेणखत,१५ किलो निबोळी पेंड ( ८००:३००:६०० ग्रॅम/झाड नत्र:स्फुरद:पालाश) दर्जेदार फळांच्या अधिक उत्पादनासाठी खतांची मात्रा पुढील प्रमाणे विभागून द्यावे. जानेवारी महिन्यात ७०० ग्रॅम युरिया + ९०० ग्रॅम एसएसपी, मार्च महिन्यात ७०० ग्रॅम युरिया + ९०० ग्रॅम एसएसपी, मे महिन्यात ३५० ग्रॅम युरिया + ५०० ग्रॅम एमओपी, जुलै महिन्यात २५० ग्रॅम एमओपी आणि सप्टेंबर महिन्यात २५० ग्रॅम एमओपी द्यावे. बहार घेताना या खतांशिवाय ५०० ग्रॅम व्हॅम + १०० ग्रॅम पीएसबी + १०० ग्रॅम ट्रायकोडर्मा हरजियानम + १०० ग्रॅम ॲझोस्पिरिलम द्यावे.

डाळिंब:

पूर्ण वाढलेल्या झाडास शेणखत ४० ते ५० किलो (६२५:२५०:२५० ग्रॅम/झाड नत्र:स्फुरद:पालाश) प्रती वर्ष, नत्र दोन समान हप्त्यात विभागून द्यावे. म्हणजेच बहार धरतेवेळी ७०० ग्रॅम युरिया, संपूर्ण एसएसपी १५५० ग्रॅम व एमओपी ४०० ग्रॅम उरलेले अर्धे नत्र (युरिया ७०० ग्रॅम) फळांच्या गाठी धरल्यानंतर २-३ वेळा विभागून द्यावे.

### • फळझाड, लागवडीचे अंतर, हेक्टरी संख्या व प्रमुख जाती:

| फळझाड | लागवडीच्या खड्ड्याचा आकार (मीटर) | लागवडी चे अंतर (मीटर) | हेक्टरी झाडांची संख्या | एकरी झाडांची संख्या | प्रमुख जाती |
|---|---|---|---|---|---|
| आंबा | १ x १ x १ | १० x १० | १०० | ४० | हापूस, केशर, लंगडा, पायरी, रत्ना, सिंधू, वनराज, साई–सुगंध, तोतापुरी, सुवर्णा, फुले अभिरुची |
| चिकू | १ x १ x १ | १० x १० | १०० | ४० | कालीपत्ती, पिलीपत्ती, क्रिकेटबॉल |
| पेरू | ०.६ x ०.६ x ०.६ | ६ x ६ | २७७ | १११ | सरदार (लखनौ ४९) |
| अंजीर | ०.६ x ०.६ x ०.६ | ४.५ x ३ | ७४० | २९६ | पुन फिग, दिनकर, फुले राजेवाडी |
| लिंबू | १ x १ x १ | ६ x ६ | २७७ | १११ | साई शरबती, फुले शरबती |
| मोसंबी | १ x १ x १ | ६ x ६ | २७७ | १११ | मोसंबी, फुले मोसंबी |
| डाळिंब | १ x १ x १ | ४.५ x ३ | ७४० | २९६ | भगवा, सुपर भगवा |
| नारळ | १ x १ x १ | ७.५ x ७.५ | १७७ | ७१ | बाणवली, प्रताप, टी x डी केरासंकारा), डी x टी (चंद्रसंकरा) |

(संपर्क :+९१ ९४०४०३२३८९)